वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय
O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State
Phone No.- 0712-2560953
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website – www.mahaforest.gov.in
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य,
Principal Chief Conservator of Forest (Wildlife) Maharashtra State
"Van Bhavan", 3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur – 440 001.

क्रमांक :- कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र. १५१(नोडल)/ ५५२ /२०२२-२३, दिनांक २६ /०५/२०२२

प्रति,
प्रधान सचिव (वने)
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२.

विषयः- भताळी ओपनकास्ट माईन या प्रकल्पाच्या विस्तारीकरण वेस्टर्न कोलफिल्डस लिमी यांचा ०.२० हे. झुडपी जंगल वळती करणेबाबत.

संदर्भ:- महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक एफ.एल.डी. - ३६२०/प्र.क्र.४०/फ-१०, दिनांक ०१/०१/२०२१.

संदर्भीय पत्रान्वये विषयांकित प्रकरणी अभिप्राय सादर करण्याचे निर्देश होते. सदर निर्देशाचे अनुषंगाने, कळविण्यात येते की, भताळी ओपनकास्ट माईनच्या विस्तारीकरणासाठी ०.२० हे. झुडपी जंगल हे कोणत्याही संरक्षित क्षेत्र, पर्यावरण संवेदनशील क्षेत्र, बफर क्षेत्र किंवा व्याघ्र भ्रमणमार्गात येत नाही, त्यामुळे सदर प्रस्तावास वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टिकोनातून वेगळया मान्यतेची गरज नाही, त्यामूळे हयाची राज्य वन्यजीव मंडळामध्ये चर्चा होणे आवश्यक नाही.

तथापि, चंद्रपूर जिल्हा हा वन्यप्राण्यांचे दृष्टिने समृध्द असुन, वाघांची संख्याही वाढते आहे. वन्यप्राण्यांचे भ्रमणमार्ग निश्चित नसल्याने, दुरोगामी विचार करता व सदर खाणकाम परिसरात असलेला वाघांचा वापर लक्षात घेता, येथील व्याघ्र व इतर वन्यजीवांच्या अधिवासावर व वन्यजीव भ्रमण मार्गावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी सदर परिसरामध्ये आवश्यक उपशमन - उपाययोजना करणे गरजेचे असून, यासाठी वन्यजीव अधिवास व वन्यजीव भ्रमणमार्ग यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी , मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर यांच्यामार्फत व वनसंरक्षक व क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांच्या सल्ल्याने वन्यजीव संवर्धन आराखडा तयार करण्यात येत असून, भताळी ओपनकास्ट माईन प्रकल्पास शासनाकडून मंजूरी प्रदान करावयाची झाल्यास, सदर वन्यजीव संवर्धन आराखडयाची अंमलबजावणी करण्याविषयी चे बंधपत्र प्रकल्प यंत्रणेकडून घेण्यात यावे, आणि त्या अनुषंगाने कार्यवाही व्हावी.

(सुनील लिमये)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य

प्रतिलीपी - १. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर यांना माहती व योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.
४. विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.